# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


दिनांक २६/०४/२०१७

क्रमांक:-झोपुप्रा/ ५६५/प्रशा/२०१७

**कार्यालयीन परिपत्रक क्र. २०७**

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी विकसकांची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे कार्यालयाकडे नोंदणी करणेबाबत**

**संदर्भ :-** १) कार्यालयीन परिपत्रक क्र.२१ दिनांक २५/६/२००७
२) कार्यालयीन परिपत्रक क्र.१६२ दिनांक १९/८/२०१५
३) कार्यालयीन परिपत्रक क्र.१९६ दिनांक ९/११/२०१६
४) दि.१७/०३/२०१७ रोजीची कार्यालयीन कामकाज आढावा बैठक

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची दिनांक ११/९/२०१४ रोजीचा विशेष नियमावलीतील तरतूद क्र.एस.आर.४ (१) व (२) नुसार कोणत्याही खाजगी व सार्वजनीक मालकीच्या झोपडपट्टी व्याप्त मिळकतीवर पुर्नवसन योजना प्रस्ताव केवळ नोंदणीकृत विकसकामार्फतच स्विकारण्याची तरतूद आहे.यानुसार संदर्भीय कार्यालयीन परिपत्रकामध्ये नमूद निकषांनुसार 'अ', 'ब' आणि 'क' या तीन वर्गामध्ये विकसकांची नोंदणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे करण्यात येत आहे.

नव्याने नोंदणी केलेल्या भागिदारी संस्था/ लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप फर्म/ प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनी/प्रोपायटरी संस्था यांच्या विकसक नोंदणीकरीता पुढीलप्रमाणे निकष किंवा अटी ठरविण्यात येत आहे.

अ) **नव्याने नोंदणी केलेल्या भागीदारी संस्था/लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशीप फर्मकरीता पुढीलप्रमाणे निकष किंवा अटी ठरविण्यात येत आहेत.**

१) विकसक नोंदणी फॉर्म फी रु.१०,०००/- भरल्याची पावती.

२) भागीदारी संस्था / लमिटेड लायबिलिटी पार्टनरशीप फर्म अस्तित्वात आल्यापासून संस्थेचे ऑडीटेड बॅलन्सशिट.(लागु असल्यास)

३) भागीदारी संस्था / लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशीप फर्म अस्तित्वात आल्यापासून संस्थेचे आयकर विवरण पत्र.(लागु असल्यास)

४) भारतीय भागीदारी अधिनियम १९३२ नुसार भागीदारी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (भारतीय भागीदारी अधिनियमानुसार प्रमाणपत्र नसल्यास भागीदारी प्रमाणपत्र मिळणेकामी करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त होणारी पावतीची प्रत व त्याअनुषंगाने हमीपत्र) /लिमिटेड लायबिलिटी भागिदारी कायदा २००८ नुसार लिमिटेड लायबिलिटी भागिदारी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

५)नव्याने नोंदणी केलेल्या भागीदारी संस्था/ लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशीप फर्म मध्ये किमान ५० टक्के हिस्सा असलेल्या भागीदाराकडून वार्षिक उलाढाल या निकषाची परिपत्रक क्र.१६२ (शुद्धिपत्रक जा.क्र.प्रशा/९३४/२०१६ दि.१८/०६/२०१६)नुसार पुर्तता होणे आवश्यक आहे.

६) नव्याने नोंदणी केलेल्या भागीदारी संस्था/लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशीप फर्म मध्ये किमान ५० टक्के हिस्सा असलेल्या भागीदाराकडून ज्या वर्गात नोंदणी करावयाची आहे त्या वर्गाच्या वार्षिक उलाढालीच्या किमान मर्यादा रकमेच्या ५० टक्के इतकी बांधकामे मागील ३ वर्षाच्या कालावधीत करणे गरजेचे राहील.

**ब) नव्याने नोंदणी केलेल्या प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनी करीता पुढीलप्रमाणे निकष किंवा अटी ठरविण्यात येत आहेत.**

१)विकसक नोंदणी फॉर्म फी रु.१०,०००/- भरल्याची पावती.

२)कंपनी अस्तित्वात आल्यापासून कंपनीचे ऑडीटेड बॅलन्सशिट.(लागू असल्यास)

३)कंपनी अस्तित्वात आल्यापासून कंपनीचे आयकर विवरण पत्र.(लागू असल्यास)

४)कंपनी अधिनियम ,१९५६ च्या कायद्यानुसार कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र.

५)नव्याने नोंदणी केलेल्या प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनीमध्ये किमान २६ टक्के हिस्सा असलेल्या संचालकाकडून वार्षिक उलाढाल या निकषाची परिपत्रक क्र.१६२ (शुद्धिपत्रक जा.क्र.प्रशा/९३४/२०१६ दि.१८/०६/२०१६) नुसार पुर्तता होणे आवश्यक आहे.

६)नव्याने नोंदणी केलेल्या प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनीमध्ये किमान २६ टक्के हिस्सा असलेल्या संचालकांकडून ज्या वर्गात नोंदणी करावयाची आहे त्या वर्गाच्या वार्षिक उलाढालीच्या किमान मर्यादा रकमेच्या ५० टक्के इतकी बांधकामे मागील ३ वर्षाच्या कालावधीत करणे गरजेचे आहे.

**क) नव्याने नोंदणी केलेल्या प्रोप्रायटरी संस्थेकरीता पुढीलप्रमाणे निकष किंवा अटी ठरविण्यात येत आहेत.**

१)विकसक नोंदणी फॉर्म फी रु.१०,०००/- भरल्याची पावती.

२) प्रोप्रायटरी संस्था अस्तित्वात आल्यापासून संस्थेचे ऑडीटेड बॅलन्सशिट.(लागु असल्यास)

३) प्रोप्रायटरी संस्था अस्तित्वात आल्यापासून संस्थेचे आयकर विवरण पत्र.(लागु असल्यास)

४)नव्याने नोंदणी केलेल्या प्रोप्रायटरी संस्थेमध्ये संस्थेच्या प्रोप्रायटरकडून वार्षिक उलाढाल या निकषाची परिपत्रक क्र.१६२ (शुद्धिपत्रक जा.क्र.प्रशा/९३४/२०१६ दि.१८/०६/२०१६) नुसार पुर्तता होणे आवश्यक आहे.

५) नव्याने नोंदणी केलेल्या प्रोप्रायटरी संस्थेच्या प्रोप्रायटरकडून ज्या वर्गात नोंदणी करावयाची आहे त्या वर्गाच्या वार्षिक उलाढालीच्या किमान मर्यादा रकमेच्या ५० टक्के इतकी बांधकामे मागील ३ वर्षाच्या कालावधीत करणे गरजेचे आहे.

विकसक नोंदणी प्रस्ताव दाखल करताना भविष्यात दाखल होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे कामकाज पूर्ण होईपर्यंत भागिदारी संस्था/लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप संस्था यामधील भागीदार, प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनी यातील संचालक, प्रोप्रायटरी संस्थेतील प्रोप्रायटर हे अनुक्रमे संबंधीत भागीदारी संस्था/लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप संस्था, प्रायव्हेट लिमिटेड / लिमिटेड कंपनी, प्रोप्रायटरी संस्था यातून निवृत्त होणार नाहीत याबाबत Affidavit/undertaking सादर करणे आवश्यक राहील.

तसेच सदर विषयाबाबतच्या नस्ती सहाय्यक (प्रशासन) यांनी तहसिलदार तथा सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात.

सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील.

स्वाक्षरीत

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

**प्रत :-**

१. सचिव, झोपुप्रा, पुणे.
२. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी,झोपुप्रा,पुणे. ( श्री. सुरेश जाधव /श्रीमती विजया पांगारकर )
३. प्र.सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा., पुणे. ( श्री. अ.ना. वगदुर्गी )
४. तहसिलदार तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे. ( श्रीमती गीता गायकवाड )
५. तहसिलदार, झो.पु.प्रा.,पुणे ( श्रीमती राधिका हावळ )
६. उप अभियंता, झोपुप्रा, पुणे. ( श्री. अ. भा. पाटील )
७. नगर रचनाकार, झोपुप्रा., पुणे ( श्री. अ. बा. पाटील )
८. श्री.सु.न.गोडगे,लेखाधिकारी
९. श्री.पंडीत पाटील.सहायक. लेखाधिकारी
१०. श्रीमती सुप्रिया सावळवाडे. सहायक
११. कनिष्ठ अभियंता, झोपुप्रा, पुणे. (श्री. जतकर)
१२. श्रीमती मेघा ओतारी,उपलेखापाल
13. श्रीमती आर.बी.हजारे/श्री.धर्माकांबळे,अव्वल कारकून
14. प्रशा/आस्था/लेखा/तांत्रिक/ताबा/अपिल/कायदा सल्लागार.